## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ६२६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–२९/०९/२०१६

**१) लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन लाच घेतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०९/२०१६ रोजी ११.०० ते १५.३० वा. दर. यातील तक्रारदार मनोज विनायक राऊत वय २६ वर्ष, रा. लाखांदुर प्लॉट यांचा ऑटोरिक्षा लाखांदुर ते वडसा रोडवर चालु देवुन मोटार वाहण कायदया खाली कोणतीही केस न करण्याचे कामाकरीता मागील महिण्याची व चालु महिण्याची प्रतीमहा ऐन्ट्री (मासिक हप्ता )असे एकुण ५००/–रु. लाच रक्कमेची मांगणी केली व स्वतःचे आर्थीक फायदया करीता लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन वाम व भ्रष्ट मार्गाने तक्रार यांचे कडुन तडजोडी अंती ४००/–रु. लाच रक्कम पंच, साक्षीदारा समक्ष स्विकारतांना रंगेहात पकडण्यास आल्या वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ७,१३(१)(ड),१३(२) लाच लुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. टेकाम एसीबी गडचिरोली पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अल्पवयीन मुलीस कृरतेची वागणुक दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०९/२०१६ रोजी १२.३० वा. दरम्यान. यातील आरोपी क्र. ३ ही पिडीत मुलगी हिची आई असुन मुलीला ५,०००/–रू. महिणा श्रम तारण घेवुन आरोपी क्र. १,२ कडे कामास ठेवले आरोपी क्र. १ व २ हे पिडीत मुलीस भांडी, कपडे धुने, फरशी पुसने असे काम घेवुन पोटभर जेवन न देता कामात चुकी झाल्यास शारीरीक त्रास देवुन कृरतेची वागणुक देत असल्याने फिर्यादी यांचे निदर्शनास आले, असे फिर्यादी देवानंद सुधाकर देशमुख वय २८ वर्ष रा. विद्यानगर भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७४ भांदवि सहकलम ७५ मुलीची काळजी व संरक्षण अधी. सहकलम ४,५,६ श्रम तारण ठेवने अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन जिवे मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक २६/०९/२०१६ रोजी २१.३० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात सार्वजनीक ठिकाणी लज्जास्पद बोलुन गालावर आरोपी क्र. १ ने थापड मारुन आरोपी क्र. २ ने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी खुशाल तुकाराम चौधरी वय १७ वर्ष, रा. बाळापुर कॅम्प यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**४) सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर वाहतुकीस व लोकांना अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २८/०९/०१६ रोजी १७.०० ते १७.३० वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील टाटा गाडी क्र. एमएच ३६एफ १०८४ चा चालकाने ताब्यातील वाहन सार्वजनीक आमरोडवर येना–या जाना–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका होईल अशा स्थितीत उभे करुन मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९०१११७०६००

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.